लोकमत

# नगर परिषद कार्यालय, कारंजा जि.वाशिम

co.karanja@gmail.com

## कंत्राटी पदभरतीची जाहीर सुचना

या जाहीर सुचनेव्दारे माहीती करीता सुचना प्रसिद्ध करण्यात येते की, नगर परिषद कारंजा करीता स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी करणे व त्या अंतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध कामे करण्यासाठी नगर परिषद कारंजा अंतर्गत ११ महिन्या करीता कंत्राटी तत्वावरील शहर समन्वयक (city co- ordinator) पद भरतीची कार्यवाही करण्याचे मा. राज्य अभियान संचालक स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांचे कडील पत्र क्र./राअस/शहर समन्वयक/२१४/२३/२४ दि.२३/०२/२०२४ व मा. जिल्हा सहायक आयुक्त, (नपाप्र विभाग) जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम यांचे पत्र क्र. कक्ष-१३ (स्वच्छता) नविशा/ कावि- १९/२०२४ दि.२३/०२/२०२४ नुसार नगर परिषद ने नियोजीत केले आहे. तरी इच्छुकांनी जाहीरात प्रसिद्ध झाल्यापासुन दिनांक दि. १०/०९/२०२४ ते दि. १९/०९/२०२४ (शासकीय सुट्टी वगळून) दुपारी ५.०० वाजेपर्यंत उमेदवारा कडुन अर्ज मागविण्यात येत आहे. अर्ज नगर परिषद कार्यालयात आवक जावक विभागात सादर करावे. ई-मेलव्दारे सादर केलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. पात्र उमेदवाराना ई-मेल व्दारे मुलाखती करीता कळविण्यात येईल. पात्र उमेदवाराची मुलाखत मा. जिल्हा सह. आयुक्त जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम येथे घेण्यात येईल.

| पदाचे नाव | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता व अनुभव | वयोमर्यादा | मासिक मानधान |
|---|---|---|---|---|
| शहर समन्वयक (city co-ordinator) | 1 | मान्यताप्राप्त विदयापीठातील खालीलपैकी कोणत्याही शाखेतील पदवी<br>१) बी.ई/बी टेक (कोणताही शाखा)<br>२) बि.आर्क<br>३) बी. प्लानिंग<br>४) बी.एस.सी. (कोणताही शाखा)<br>अनुभव - नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेशी निगडीत कामाचा किमान सहा महिन्याचा अनुभव आवश्यक. | कमाल वयोमर्यादा ३५ वर्ष (शहर समन्वयक म्हणुन अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास अनुभवा इतकी वयो- मर्यादा मर्यादा शिथील राहील | रु.४५०००/- (रु. पंचेचाळीस हजार मात्र) |

सविस्तर अटी व शर्ती इतर माहीती विभाग प्रमुख, आरोग्य विभाग येथे पाहावयास उपलब्ध आहे. वेळापत्रक बदल, मुलाखत वेळ व इतर सुचना उमेदवारास त्यांनी सादर केलेल्या इ-मेल वर सुचित करण्यात येईल. कोणतेही कारण न देता उमेदवारांचे अर्ज मंजुर अथवा नामंजुर करण्याचे अधिकार मुख्यधिकारी यांनी राखून ठेवले आहे.

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, कारंजा**